मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील
माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार.

क्र. रामाआ-तक्रार क्र. १४/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

श्री. प्रशांत मधुकर चव्हाण — अपिलार्थी

विरुध्द

१) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी- २,
पुणे प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे — उत्तरवादी
२) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
विद्युत विभागीय कार्यालय, कोल्हापुर
३) जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक,
विद्युत विभागीय कार्यालय, कोल्हापुर
४) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,
विद्युत विभागीय कार्यालय, मिरज
५) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक,
विद्युत विभागीय कार्यालय, मिरज

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता (विद्युत),
पुणे प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे

## आदेश पारीत दिनांक: १६/०९/२०२१

अपिलार्थी यांनी दि. १०/०३/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता.

प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना Email/Whats Appद्वारे सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार सुनावणीस अपिलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर आहेत.

सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "द्वितीय अपील क्र. १२७७+१२७९+१२८०+१२८१+१२८२+१२८३/२०१७ च्या प्रकरणी आयोगाने आदेश दिले आहेत त्यापैकी द्वितीय अपील क्र. १२७७+ १२७९/२०१७ मध्ये आयोगाने दि.९/८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये अवलोकनाची संधी देऊन माहिती पुरविण्याचे निर्देश दिले. मला अपूर्ण माहिती पुरविली आहे. द्वितीय अपील क्र. १२८२+१२८४/२०१७-सांगली मध्ये रु.५०००/- दंड केलेला आहे, सदरची रक्कम जन माहिती अधिकारी, मिरज यांच्याकडून भरुन न घेता जन माहिती अधिकारी, कोल्हापूर यांच्या कडून भरणे आवश्यक होते. मला अवलोकनाची संधी दिली, अवलोकन केले व शुल्क भरुन माहिती स्विकारलेली आहे. सर्व प्रकरणात मला मोफत पूर्ण माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी अपिल चालविले नाही."

सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे कथन केले की, "अधिक्षक अभियंता विद्युत, पुणे यांच्या नांवाने अर्ज करुन माहिती अर्ज मिरज कार्यालयाकडे दिलेला आहे. मिरज कार्यालयाने सदरचा अर्ज पुणे कार्यालयाडे वर्ग केला आहे. मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २६/१०/२०१५ च्या परिपत्रकानुसार व आयोगाच्या आदेशाप्रमाणे अवलोकनाची संधी देऊन अपिलार्थीस १५०

पृष्ठांची माहिती रु. ३८० शुल्क भरणा करुन घेऊन रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे. सदर पत्राची प्रत व अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याची पोच आयोगास सादर केलेली आहे."

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की, १) आयोगाने व्दितीय अपिल क्र. १२८०/२०१७ मध्ये दिलेल्या दि. ०९/०७/२०१९ रोजीच्या आदेशाची अमंलबजावणी झाली असुन त्यानुसार अपिलार्थीस निरीक्षणाची संधी देऊन निर्देश सुचीनुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. १९/१२/२०१९ रोजी विनामुल्य माहिती पुरविली आहे. तसेच जन माहिती अधिकारी श्री. मा. र. शिंदे यांनी शास्तीची रक्कम रु. ५०००/- शासन तिजोरीत जमा करुन चलनाच्या प्रतीसह आयोगास अवगत केलेले आहे.

सबब आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ले. धारूरकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्र. ६०९/२०२२/सांमाआ दिनांक- २९/४/२२